क्रमांक/दंडप्र/ 1 /कावि/401/2020
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय,
जळगांव दिनांक - 14/08/2020

**प्रति,**

1) उपविभागीय दंडाधिकारी (सर्व)

2) मुख्याधिकारी (सर्व)

3) तालुका आरोग्य अधिकारी (सर्व)

**विषय:- कोवीड प्रतिबंधक उपाययोजना**
**खाजगी डॉक्टरर्स यांचेमार्फत रुग्णांवर होत असलेल्या उपचारां बाबत**

जिल्हयामध्ये कोरोनाचे रुग्ण दिवसेंदिवस वाढत आहे. कोरोना बाधीत रग्णांपैकी मृत्यु झालेल्या रुग्णांचे जिल्हयाचे प्रमाण हे 4.5 % असुन हे प्रमाण राज्याच्या सरासरीपेक्षा जास्त आहे. या संदर्भाने माहिती घेतली असता काही मृत्यु हे रुग्ण रुग्णालयात उशीरा दाखल झाल्यामुळे झाल्याचे दिसुन आले आहे. रुग्ण उशीरा का दाखल होत आहे याच्या कारणांचा शोध घेतला असता रुग्ण हे प्रथम जनरल प्रॅक्टीशनर्स यांचेकडे जात असुन जनरल प्रॅक्टीशनर्स यांचेकडुन त्यांचेवर तापाची ट्रिटमेंट, सलाईन लावणे, रक्त लघवी तपासणे, टायफॉईड ट्रिटमेंट करत असुन यामध्येच पेशंटचा बराचसा वेळ जात असुन अत्यवस्थ झाल्यानंतर कोरोनाची ट्रिटमेंट करण्यासाठी पेशंट उशीराने दवाखान्यात पोहचत आहे.

खाजगी वैद्यकीय प्रॅक्टीशनर्स यांचेमार्फत कोरोनाचे रुग्णांवर उपरोक्त प्रमाणे होणारे उपचारही निश्चितच गंभीर बाब आहे. सदरची बाब लक्षात घेता सर्व खाजगी डॉक्टर यांना खालील प्रमाणे सुचना द्याव्यात.

1) एखाद्या रुग्णामध्ये ताप, घशात खवखव, श्वसनाचा त्रास, सर्दी, थंडी वाजणे, अंगदुखी, डोकेदुखी, अशक्तपणा, उलटी, अतिसार, खोकल्यातुन रक्त या सारखी कोरोनाची लक्षणे दिसत असलेल्यास सदर रुग्णास कोरोनाचा संशयित रुग्ण म्हणुन आयसीएमआर च्या गाईड लाईननुसार त्वरीत उपचार सुरु करावेत.

2) अशा रुग्णांना त्वरीत प्राथमीक आरोग्य केंद्र / ग्रामीण रुग्णालय येथे त्यांचा स्वॅब/ अॅटीजन टेस्ट घेण्यासाठी पाठविणे.

3) सदर रुग्णांचा स्वॅब घेतला आहे किंवा नाही येथपर्यत पाठपुरावा खाजगी डॉक्टरर्स यांनी करणे.

4) रुग्ण पाठवुनही स्वॅब घेण्यात आला नसेल तर त्वरीत संबंधित उपविभागीय अधिकारी यांचेशी सपर्क साधणे.

5) उपविभागीय अधिकारी यांनी खाजगी डॉक्टरर्स मार्फत रेफर झालेल्या रुग्णांची यादी व त्यावर करण्यात आलेली कारवाई , रुग्णांची यादी प्राप्त होत नसल्यास ती प्राप्त करणे यासाठी एका नोडल अधिकारी यांची नेमणुक करावी. संशयीत कोरोना रुग्णांची माहिती जनरल प्रॅक्टीशनर्स यांनी गुगल फॉर्मवर भरणे बंधनकारक आहे.

गुगल फॉर्म लिंक https://docs.google.com/forms/d/1VHsJApTfHnG0D1V1P2PfR0sYr55IKt3f8qHqifN3NQ4/edit?usp=sharing जनरल प्रॅक्टीशनर्स डॉक्टराना उपलब्ध करुन द्यावी. सदर भरलेल्या माहितीचे दररोज संध्याकाळी छाननी करुन घेऊन त्या व्यक्तीचा स्वॅब घेणे/ अॅटीजन टेस्ट घेणे याचे नियोजन उपविभागीय अधिकारी/ मुख्याधिकारी यांनी करावे.

6) कोरोनाबाधीत रुग्ण हे False Typhoid Positive येत असल्याने जनरल प्रॅक्टीशनर्सची उपचाराची दिशा चुकत असल्याचे निदर्शनास आले आहे, ही बाब जनरल प्रॅक्टीशनर्स यांचे निदर्शनास आणावी.

7) दिवसभरामध्ये केलेल्या कामाचा आढावा दररोज संध्याकाळी 07.00 वाजता व्हिडीओ कॉन्फरसिंगव्दारे घेण्यात येईल. सदर व्हि. सी. साठी उपविभागीय अधिकारी आणि तालुका आरोग्य अधिकारी यांनी उपस्थित रहावे.

8) मागील 8 दिवसामध्ये कोरोनाची लक्षणे असलेल्या ज्या रुग्णांवर खाजगी डॉक्टरर्स यांनी उपचार केलेले आहेत अशा सर्व रुग्णांची यादी त्यांचेकडुन आजच प्राप्त करुन घ्यावी आणि अशा सर्व रुग्णांचे दोन दिवसात स्वॅब घेऊन त्यांची अॅटीजन / आरटीपीसीआर टेस्टव्दारे तपासणी करुन घ्यावी.

9) ग्रामीण भागामध्ये अजुनही काही बोगस डॉक्टरर्स यांचेकडे कोणतीही वैद्यकीय पदवी नसताना खाजगी प्रक्टीस करीत असल्याचे निदर्शनास येत आहे. यास प्रतिबंध घालण्यसाठी तालुकास्तरावर याची तपासणी करण्यासाठी एक पथक तयार करावे. पथकाने केलेल्या कारवाईचा आढावा उपविभागीय अधिकारी यांनी घ्यावा.

उपरोक्त सुचना सर्व खाजगी प्रॅक्टीस करणारे डॉक्टर्स यांचे निदर्शनास आणुन द्याव्यात. सदर सुचनांचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित डॉक्टर हे इपिडेमिक अॅक्टनुसार कारवाईस पात्र राहतील .

एखादा कोरोना बाधीत रुग्ण खाजगी डॉक्टरर्स यांचेकडे ट्रिटमेंट घेत असेल तथापी सदर रुग्णाचा वेळेत निदान न झाल्यामुळे/उशीरा कोविड हॉस्पीटलमध्ये दाखल झाल्यामुळे मृत्यु झाल्यास त्यांचे प्रशासकीय ऑडीट Death Audit करणेत येणार असुन त्यामध्ये जर वरील प्रोटोकॉलचे उल्लंघन झालेले आढळल्यास संबंधित डॉक्टर हे इपिडेमिक अॅक्टनुसार कारवाईस पात्र राहतील.

नगरपालिका क्षेत्रामध्ये उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करण्याची जबाबदारी मुख्याधिकारी, नगरपरिषद यांची राहील. त्यांनी सुध्दा दररोज सायंकाळी 07.00 वाजता होणाऱ्या व्हि. सी. साठी उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित रहावे.

**(अभिजीत राऊत)**
**जिल्हाधिकारी, तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगांव**

प्रत :- मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. जळगाव यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव

प्रत :- जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. जळगांव यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव